पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १८५**
(सभावृत्तांत)

**दिनांक – १९/०८/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.स्थायी** समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **१९/०८/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते तसेच सदर सभेत काही सन्मा. सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
८. मा.संतोष बबन कांबळे
९. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१०. मा.फुगे भिमाबाई पोपट
११. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१२. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.पाटील - अति.आयुक्त (१), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.तांबे, मा.निकम - सह शहर अभियंता, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२३) पुणे महानगर विकास प्राधिकरण यांना अण्णासाहेब मगर मैदान पिंपरी येथे उभारण्यात येणा-या जंबो हॉस्पीटल/ कोव्हीड हॉस्पीटलसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणेबाबत.

विषय क्र.२४) पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१ अंतर्गत गांधीनगर या झोपडपट्टीचे पुनर्वसन

/पुनर्निर्माण करणेबाबत.

विषय क्र.२५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ऑटो क्लस्टर येथे कोरोना Covid 19 रूग्णालय उभारणे कामा अंतर्गत विद्युत व्यवस्था व वातानुकुलन व्यवस्था करणेसाठी सल्लागार नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.२६) प्रभाग क्र.१६ येथे उद्यान विकसीत करणे (अमृतयोजना) या कामाच्या तरतुदीच्या वर्गीकरणाबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२७) सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील इ क्षेत्रीय स्थापत्य कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये वाढ/घट करणेबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये तरतुद वर्गीकरण करणेबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२९) पिंपरी येथील इंदिरा गांधी उड्डाण पुलाखालील जागा दिपंकर मजूर सहकारी संस्था मर्यादित, पिंपरी यांना भाडे कराराने देणेबाबत. – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे, यांचा प्रस्ताव

विषय क्र.३०) नागरवस्ती विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात मानधन तवावर एम.एस.डब्ल्यु. समुह संघटक नेमणूकीबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.आरती चौंधे

माजी महापौर रंगनाथदादा फुगे, जेष्ठ संगीत मार्तंड पंडीत जसराज, जेष्ठ कसोटी क्रिकेटपट्टू चेतन चौहान, प्रसिध्द शायर गीतकार राहत इंदोरी, एअर इंडिया विमान दुर्घटनेत कॅप्टन दीपक साठे व अन्य यांचे निधन व काश्मीर मधील बारामल्ला जिल्ह्यात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत दोन जवान शहीद झाले तसेच कोविडमुळे मृत्युमुखी पडलेले शहरातील नागरिक या सर्वांचे नुकतेच दुःखद निधन झाले आहे. आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत येवून बुधवार दि.१९/०८/२०२० ची मा.स्थायी समितीची सभा गुरूवार दि.२०/०८/२०२० रोजी स.११.०० वा. पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

**सभापती -** बुधवार दि.१९/०८/२०२० ची मा.स्थायी समितीची सभा गुरूवार दि.२०/०८/२०२० रोजी स.११.०० वा. पर्यंत तहकुब करणेत येत आहे.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८५**

(सभावृत्तांत)

(दि.१९/०८/२०२० रोजी स.२.३० वा ची तहकूब सभा)

**दिनांक – २०/०८/२०२०** **वेळ – स. ११.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.स्थायी** समितीची दिनांक १९/०८/२०२० (दुपारी २.३० वा.) ची **तहकूब** सभा गुरूवार दिनांक **२०/०८/२०२०** रोजी **स.११.०० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते तसेच सदर सभेत काही सन्मा. सदस्य आणि संबंधित अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे मयूर पांडूरंग
६. मा.कलाटे राहूल तानाजी
७. मा.कदम शशिकांत गणपत
८. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
९. मा.संतोष बबन कांबळे
१०. मा.अभिषेक गोविंद बारणे
११. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२. मा.फुगे भिमाबाई पोपट
१३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१४. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.तुपे – प्र.अति.आयुक्त(३) तथा सह शहर अभियंता (वि/यां), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.चारटणकर – उपआयुक्त, मा.भालकर – सह शहर अभियंता, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.खाबडे – कार्यकारी अभियंता, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच

मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.तांबे, मा.निकम, मा.सवणे - सह शहर अभियंता, मा.लोणकर, मा.जोशी, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.पोमण–मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.ओंभासे, मा.गलबले, मा.चव्हाण, मा.मोरे, मा.टकले, मा.राऊत, मा.वावरे, मा.पवार, मा.धुमाळ – कार्यकारी अभियंता, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

अ) दिनांक २९/०७/२०२० रोजी (दु.२.३० वा), दि.०५/०८/२०२० रोजी (दु.२.१५ वा), व दि.१२/०८/२०२० रोजी (दु.२.०० वा), झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८२) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०५/०८/२०२० रोजी (दु.२.३० वा), व दि.१२/०८/२०२० रोजी (दु.२.१५ वा), झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८३) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक १२/०८/२०२० रोजी (दु.२.३० वा) झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८४) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७३४६ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – मध्य.सा.भां.,वैद्यकिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/३४२/२०२०, दि.०१/०७/२०२०

विषय – Standard Q Covid 19 Ag detection Kit खरेदीबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार दिनांक २३/०९/२०२० चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४७ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१०/कावि/२०२/२०२०, दि.०७/०७/२०२०

विषय – कोवीड १९ च्या संसर्गजन्य रोगावर प्रतिबंधात्मक उपाय योजना करणेकामी वैद्यकिय विभागाकडील अंदाजपत्रकातील तरतूद वर्ग करणेबाबत..

विषय क्रमांक २ चा विचार दिनांक ०९/०९/२०२० चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४८ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – मध्य.सा.भां.वैद्यकिय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मासाभां/५/कावि/३९१/२०२०, दि.१३/०७/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid 19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालिन परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यादृष्टीने मनपाच्या वतीने म्हाळुंगे बालेवाडी स्टेडियम, आकुर्डी पिंपरी चिंचवड इंजि. कॉलेज, Balaji Law College, Tathawade, DY Patil College Girls Hostel, Ravet, KSB Chowk- BSNL (Ladies Hostel), Boys Hostel, Moshi व Ladies Hostel - Indrayani Nagar येथे Covid Care Centre (CCC) सुरु करण्यात आलेले असून माहे मे २०२० व माहे जुन २०२० या कालावधीत केलेल्या हाऊसकिंपींग कामाकरीता मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., यांना किमान वेतन दराने वेतन अधिक केमीकल व साहित्यापोटी याप्रमाणे र.रु.४९,८६,४८२/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख शहाऐंशी हजार चारशे ब्याऐंशी फक्त) चे खर्चास तसेच माहे जुलै २०२० पासून पुढील कालावधीत किमान वेतन दराप्रमाणे अधिक केमीकल व साहित्यापोटी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३४९ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सहा. आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.माभां/६/कावि/२५७/२०२०, दि.३१/०७/२०२०

मा.सहा. आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उभारणेत येणा-या कोवीड-19 सेन्टर करीता विविध प्रकारचे विद्युत साहित्य (सिलींग फॅन, इलेक्ट्रॉनिक स्टेप टाईप रेग्युलेटर व गिझर) खरेदीबाबत ई निविदा क्र.19/2020-21 अन्वये सात निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.सुरज स्विचगेअर यांचे बाब क्र.1 साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.5,72,670/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.6,51,000/- दरापेक्षा -12.03% ने कमी आहेत. तसेच मे.अर्थरॉन टेकनॉलॉजिस यांचे बाब क्र.2 व 3 साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.11,71,485/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.12,64,263/- या दरपेक्षा -7.34% ने कमी आहेत. यानुसार एकुण 1 ते 3 विविध प्रकारचे विद्युत साहित्यांचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.17,44,155/- हे अंदाजपत्रकीय दर एकुण र.रू.19,15,263/- पेक्षा -8.93% ने कमी असल्याने सदर दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. यानुसार सदर लघुत्तम निविदाकार यांना तातडीने पुरवठा आदेश निर्गत करून त्यांचेबरोबर करारनामा करणेची कार्यवाही करणेत आलेली असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७३५०
विषय क्रमांक – ०५
दिनांक – २०/०८/२०२०
विभाग – आरोग्य मुख्यालय
सुचक – मा.भिमाबाई फुगे
अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/११/कावि/२०५/२०२०, दि.०७/०८/२०२०

विषय – इ क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रभाग क्र.३, ४, ५ व ७ मधील सार्वजनिक शौचालय व मुतारी यांची दैनंदिन साफ सफाई करणेबाबत.

विषय क्रमांक ५ चा विचार दिनांक ०९/०९/२०२० चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५१
विषय क्रमांक – ०६
दिनांक – २०/०८/२०२०
विभाग – आरोग्य
सुचक – मा.शशिकांत कदम
अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचे पत्र क्र.आमुका/२/कावि/१६५/२०२०, दि.०६/०८/२०२०

मा.अति. आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातंर्गत ई निविदा नोटीस क्र.४/२०१७-१८ अन्वये मनपा कार्यक्षेत्रातील ३६ स्मशान/ दफनभूमीत किमान वेतन दराने सुरक्षा काळजीवाहक प्रतिदिन ३ पाळयांमध्ये पुरविणे मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ऍ़ड सिस्टीम प्रा.लि. व सैनिक इंटलिजेन्स ऍ़ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना समान/विभागून कामकाज वाटप करुन दि.१/४/२०१८ ते दि.३१/३/२०२० या ०२ वर्षे कालावधीसाठी कामाचे आदेश देण्यात आले होते. सदर कामाचा कालावधी दि.३१/३/२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. सदर कामाची नविन निविदा कार्यवाही सुरु असल्याने व कोरोना आजाराची साथ चालू असल्याने नि.नो.क्र.४/२०१७-१८ मधील मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ऍ़ड सिस्टीम प्रा.लि. व सैनिक इंटलिजेन्स ऍ़ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना दि.१/४/२०२० ते दि.३१/५/२०२० या ०२ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदरची मुदत संपुष्टात आल्याने व नविन निविदेची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याने सदर कामास दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० या ०१ महिना कालावधीसाठी मुदतवाढ देणेस व या कामी येणा-या (रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ऍ़ड सिस्टीम प्रा. लि. यांचे १० स्मशानभूमीसाठी र.रु.८,१९,५०२/- व सैनिक इंटलिजेन्स ऍ़ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचे ०३ स्मशानभूमीसाठी र.रु.२,४५,८५१/-) एकत्रीत अंदाजे र.रु.१०,६५,३५३/- (अक्षरी र.रू.दहा लाख पासष्ठ हजार तीनशे त्रेपन्न फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास या कामासाठी मुदतवाढ देणेस तसेच आवश्यक अटी/ शर्तीचा करारनामा करुन मुदतवाढ कामाचा आदेश देणेस महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५२ विषय क्रमांक – ०७
दिनांक – २०/०८/२०२० विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मासंतोष कांबळे.
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माशि/५/कावि/४३५/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालय काळभोरनगर येथे आयटीच संस्थेव्दारे इ.८ वी ते १० वी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करणेबाबत मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असुन सदरच्या विद्यालयास व येणा-या सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात अंदाजे खर्च र.रू.६,४६,०००/- (अक्षरी र.रू.सहा लाख शेहेचाळीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५३ विषय क्रमांक – ०८
दिनांक – २०/०८/२०२० विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माशि/०१/कावि/४२०/२०२०, दि.०६/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत मराठी माध्यमाच्या १८ माध्यमिक विद्यालये व ऊर्दु माध्यमाची ०६ विद्यालये कार्यरत आहेत. या विद्यालयांमधून गतवर्षी ८६०९ विद्यार्थी शिक्षण घेत होते. माध्यमिक विद्यालयाचा इ.१० वी चा सरासरी निकाल विद्यार्थ्यांना देण्यात आलेली बक्षिसे व नैसर्गिक वाढ या तत्वावर विद्यार्थी व तुकडी संख्येत वाढ होत असते. सध्या विद्यार्थी व तुकडी संख्येनुसार काही विषयांचे शिक्षक तसेच सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती इत्यादी कारणास्तव शिक्षक कमी पडत आहेत. यास्तव आवश्यक ते विषयांनिहाय शिक्षक नेमणुका करणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक यांनी वेळोवेळी केलेल्या शिक्षक मागणीस्तव मनपा माध्यमिक विद्यालयातील इ.८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून मानधनावर शिक्षक नेमणे क्रमप्राप्त आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या कामगार कल्याण विभागाच्या आदेश क्र.काक/०३/कावि/१५४/२०१८ दि.२८/०६/२०१८ च्या आदेशान्वये कुशल कामगार यांना र.रू.१७,५००/- (अक्षरी र.रू.सतरा हजार पाचशे फक्त) मानधन नमुद करणेत आलेले आहे. तथापी शिक्षक ही सज्ञा कामगार या सज्ञेत बसत नाही, असे शेरांकन गतवर्षी कामगार कल्याण विभागाने दिलेले आहे. परंतु सध्याची महागाई इ.बाबी तसेच शिक्षक पदासाठी त्यांची असणारी शैक्षणिक अर्हता पाहुन तसेच विद्यालयात शिक्षक टिकुण राहणे याकरीता सदर र.रू.१७,५००/- ही एकत्रित रक्कम मानधन म्हणून देणे योग्य होईल मानधनाव्यतीरिक्त अन्य दुसरा कोणताही आर्थीक लाभ देय राहणार नाही. (उदा.दिवाळी सानुग्रह अनुदान) कोरोना- covid -19 या संसर्गजन्य रोगामुळे मनपाची माध्यमिक विद्यालये कधी सुरू होतील हे सांगता येत नाही, परंतु विद्यालयातील विद्यार्थ्यांची पटसंख्या तसेच विद्यालयाच्या मागणीनुसार शिक्षक नेमणे कामी मान्यता घेऊन ठेवणे ऊचित होईल,म्हणजे

शाळा सुरू झाल्याच्या पहिल्या दिवसापासुन विद्यार्थ्यांना शिक्षक उपलब्ध होऊ शकतील त्याकरीता सद्य स्थितीत जाहीरात प्रसिध्द करून उमेदवारांचे अर्ज घेऊन गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करून सदर यादीस मान्यता घेऊन ठेवणे योग्य होईल म्हणजे अल्प शैक्षणिक कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. तसेच सद्य:परिस्थिती लक्षात घेता संपुर्ण राज्यामध्ये लॉकडाउन परिस्थीती असुन प्रवासाची व निवासाची कोणतीही साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे मानधनावरील शिक्षक भरती करीता स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करणेबाबत मान्यता मिळावी. पिंपरी चिंचवड मनपा माध्यमिक विभागामध्ये मराठी माध्यमा करिता -८५ व ऊर्दु माध्यम-२२ शिक्षक असे एकुण – १०७ शिक्षक नेमणुकीसाठी शिक्षकांना मासीक एकत्रित मानधन र.रू.१७,५००/- (अक्षरी र.रू.सतरा हजार पाचशे फक्त) प्रमाणे मासीक १०७ शिक्षकांना र.रु.१८,७२,५००/- (अक्षरी र.रू.अठरा लाख बाहत्तर हजार पाचशे फक्त) मासिक खर्च येणार आहे. या प्रमाणे ०६ महीन्याचा एकुण खर्च र.रू.१,१२,३५,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी बारा लाख पस्तीस हजार फक्त) सदरचा खर्च विद्यालये चालु झाल्यानंतर शिक्षक नेमणूका करणेत येणार असुन नेमणूक आदेशाच्या तारखेरपासुन सहा महीण्याच्या कालावधीकरीता होणार आहे. र.रू.१,१२,३५,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी बारा लाख पस्तीस हजार फक्त) या अपेक्षित खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच मनपाच्या वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करून स्थनिक उमेदवारांना प्राधान्याने देउन शिक्षक नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५४ | विषय क्रमांक – ०९

दिनांक – २०/०८/२०२० | विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०६/कावि/२७०/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा विभागास आवश्यक SKY WALKER ओपन जिम साहित्य खरेदीकामी Government e marketplace वर प्रसिद्ध केलेली निविदा क्रमांक GEM/2020/B/505567 नुसार 02 पात्र निविदाकारांपैकी प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.हनी फन एन थ्रिल कं. यांचे बाब क्र.01 याप्रमाणे एकुण 01 बाबी साहित्याचे प्राप्त लघुत्तम दर र.रू.95,63,700/- हे दर अंदाजपत्रकीय दर र.रू.1,01,72,951/- पेक्षा -5.99% ने कमी असल्याने सदर दर स्विकृती करणेत आलेले असून सदर प्राप्त लघुत्तम दर एकूण र.रू.95,63,700/- (अक्षरी र.रू.पच्याणाव लाख त्रेसष्ठ हजार सातशे फक्त) चे खर्चास व सदर लघुत्तम निविदाकार मे.हनी फन एन थ्रिल कं. यांचेबरोबर करारनामा करुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५५ विषय क्रमांक – १०

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/१०३१अ/२०२०, दि.०८/०८/२०२०

विषय – कोरोना विषाणूचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी बालनगरी व ऑटोकल्सटर येथे कोविड केअर सेंटर करिता खरेदी करणेबाबत.

विषय क्रमांक १० चा विचार दिनांक ०९/०९/२०२० चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५६ विषय क्रमांक – ११

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – बांधकाम परवानगी

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बीपी/अति/मुख्य/१/कावि/७५६/२०२०, दि.०४/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

``कोरोना विषाणू COVID-19`` चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कामकाजासाठी QUARANTINE (अलगीकरण) ठिकाणी नियुक्त होमगार्ड यांचे मानधन (कर्तव्यभत्ता) अदायगीकामी अतिक्रमण निर्मुलन व्यवस्था खर्च या लेखाशिर्षावर पुरेसी तरतुद शिल्लक नसलेने बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन विभागाकडील स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर उपलब्ध असलेली र.रु.१८,००,००,०००/- मधून र.रु.३,००,००,०००/- इतकी रक्कम घट करुन अतिक्रमण निर्मुलन व्यवस्था खर्च या लेखाशिर्षावर र.रु.३,००,००,०००/- इतकी वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५७ विषय क्रमांक – १२

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – बांधकाम परवानगी

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बीपी/अति/मुख्य/१/कावि/७५५/२०२०, दि.०४/०८/२०२०

विषय - ``कोरोना विषाणू COVID-19`` चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी QUARANTINE (अलगीकरण) कामकाजासाठी होमगार्ड, मानधन (कर्तव्य भत्ता अदायगीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

विषय क्रमांक १० चा विचार दिनांक ०९/०९/२०२० चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५८ विषय क्रमांक – १३
दिनांक – २०/०८/२०२० विभाग – ह क्षेत्रिय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.अति. आयुक्त-१ यांचे पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/१८१/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.अति. आयुक्त-१ यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत वॉर्ड क्र.२० मधील कासारवाडी येथील नवीन शाळा इमारतीचे काम पुर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात आहे. सदर शाळा इमारतीचा वापर करणेकामी अतिरिक्त विजभार मंजूर करुन विजपुरवठा करणे आवश्यक आहे. त्याकरिता इकडील पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/१३४/२०२०, दि.१३.०६.२०२० अन्वये म.रा.वि.वि.कं.लि.यांना कळविले असता, त्यांचेकडील कोटेशन क्र.EE/PCD/L.T.SPL/LSO/ADDL.LOAD/04/2020-21/1276 दि.२९.०७.२०२० अन्वये कोटेशन प्राप्त झाले आहे. त्यामध्ये एकूण र.रु.७८,४९०/- रक्कम कळविली आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांचे नावे शुल्क र.रु.७८,४९०/- (अक्षरी र.रू.अठ्याहत्तर हजार चारशे नव्वद फक्त) मनपाने अदा करणे आवश्यक आहे. सदरील शुल्क अदा केलेनंतर अतिरिक्त वीजभार व नवीन वीजमीटर म.रा.वि.वि.कं.लि. यांचे कडुन उपलब्ध होणार आहे. तरी सदर रक्कम म.रा.वि.वि. कंपनीस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५९ विषय क्रमांक – १४
दिनांक – २०/०८/२०२० विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/३७/२०२०, दि.२४/०६/२०२०

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्र.१० मध्ये महात्मा फुले पुतळा आ.क्र.९७ स.नं.१५५ वर अस्तित्वात असून सदर ठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारणेची मागणी जन सामान्य नागरीकातून तसेच स्थानिक नगरसदस्य यांचेमार्फत सतत होत आहे. सदर ठिकाणी सावित्रीबाई फुले यांचे स्मारक केलेस महिला वर्गात एक प्रकारचे प्रेरणास्थान प्राप्त होईल. सदर प्रकल्प वैशिष्ट्यपूर्ण असले कारणाने नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रसिद्ध करणेतसेचनिविदापुर्वव निविदा पश्चात ही सर्व कामे करणेसाठी वास्तुविशारद यांची नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. सदर बाबत मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर सल्लागार यांच्याकडून दरपत्रक मागविण्यासाठी दि.१७/०६/२०२० रोजी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करणेत आली होती. सीलबंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत दि. १९/०६/२०२० रोजी दु.३.०० पर्यंत एकूण ०३ सीलबंद कोटेशन प्राप्त झाली आहेत. सदर कोटेशन दि. १९/०६/२०२० रोजी दु.३.०० वाजता उघडण्यात आले असून सदर तक्यानुसार मे.सृष्टी डिझायनर यांनी लघुत्तम दर १.९९% (जीएसटी सोडून) सादर केलेला आहे. तरी मे.सृष्टी डिझायनर यांनी लघुत्तम दर सादर केल्याने त्यांची सदर कामाच्या निविदा

पूर्व व निविदा पश्चात आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस हरकत वाटत नाही. सबब प्रभाग क्र. १० मध्ये महात्मा फुले स्मारक परिसरात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृतीपुतळा उभारणे या कामासाठी मे.सृष्टी डिझायनर यांची लघुत्तम दर १.९९% नुसार निविदा पूर्व व निविदा पश्चात आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस व त्याकामी येणारी फी १.९९% (जीएसटी सोडून) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६० विषय क्रमांक – १५

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – अ क्षेत्रिय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.कार्य.अभि.(वि) यांचे पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/२७७/२०२०, दि.०७/०८/२०२०

मा.कार्य.अभि.(वि) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड लिंक रोड येथील विद्युत दाहिनीकरिता आणखी एक नविन दाहिनी (Furness) बसविणेत आलेली आहे. सदर नव्याने बसविलेल्या विद्युत दाहिनीमुळे वीजभार वाढणार आहे. त्यामुळे वाढीव वीजभाराकरिता आवश्यक सुरक्षाठेव रक्कम व इतर शुल्क म.रा.वि.वि.कं.लि.स अदा करणे आवश्यक आहे. सदर विद्युत दाहिनीचा सद्याचा मंजूर वीजभार ५६.२५ KVA असुन तितकाच ५६.२५ KVA वाढीव वीज भारासह एकूण ११२.५ KVA मंजूरीकामी म.रा.वि.वि कंपनीकडे इकडील पत्र क्र.अक्षे/वि/ /२०२० दि.२०.०७.२०२० नुसार विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज सादर केला असता, म.रा.वि.वि.कं.लि.यांनी त्यांचे पत्र क्र.EE/PCD/T/L.TSPL/ LSOADDL.LOAD/03/2020-21/1218 दि.29.07.2020 नुसार र.रु.५७,३३४/- अदा करणे आवश्यक आहे. तरी नव्याने बसविलेल्या विद्युत दाहिनीकरिता वाढीव वीजपुरवठा करणेकरिता म.रा.वि.वि.कं.लि. यांना र.रु.५७,३३४/- (अक्षरी र.रु.सत्तावन्न हजार तिनशे चौतीस फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६१ विषय क्रमांक – १६

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – स्थानिक संस्था कर

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्थासंक/९अ/कावि/९२/२०२०, दि.११/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मधील स्थानिक संस्था कर विभागातील वाहन इंधन अधिकारी या लेखाशिर्षावर सन २०२०-२१ साठी र.रु.१,००,०००/- तरतुद करणेत आली आहे. स्थानिक संस्था कर विभागाकडील मा.सहा.आयुक्त यांचेकडे बालेवाडी कोविड केअर सेंटर कामकाजासाठी नेमणुक केलेली आहे. सदर कामकाजासाठी त्यांना आदेश क्र.जा.क.कागा/३/२४८/२०२०

दि.१/६/२०२० अन्वये त्यांना बालेवाडी कामकाजासाठी गाडी देण्यात आली असून सदर गाडीचा वाहन इंधन खर्च हा स्थानिक संस्था कर विभागा मार्फत करण्यात यावा असे कार्यशाळा विभागाने कळविले आहे. त्यामुळे वाहन इंधन अधिकारी या लेखाशिर्षावरील तरतूद अपुरी पडत आहे. तथापि माहे जुन २०२० अखेर र.रु.६०,०००/- इतका खर्च झालेला असून र.रु.४०,०००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. स्थानिक संस्था कर विभागाकडील सन २०२०-२१ स्थायी अस्थापना लेखाशिर्षावर र.रु.४,०२,९६,०४७/- इतकी तरतुद शिल्लक असून स्थायी अस्थापना या लेखाशिर्षामधून वाहन इंधन अधिकारी या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त) वर्ग करावयाचे झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षामधून दुस-या अर्थसंकल्पी शिर्षामध्ये वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करता येत असलेने स्थायी अस्थापना या लेखाशिर्षामधून वाहन इंधन अधिकारी या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त) वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६२ विषय क्रमांक – १७

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – ह मुख्यालय. स्थापत्य

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त-१ यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/२८१/२०२०, दि.१२/०८/२०२०

मा.अति.आयुक्त-१ यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.समीर एन्टरप्रायझेस यांचेकडून र.रू.1,73,729/- अधिक 18% GST ची र.रू.31,271/- अशी एकूण र.रू.2,05,000/- (अक्षरी र.रु.दोन लाख पाच हजार फक्त) एवढी रक्कम मनपा कोषागारात भरून घेऊन दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग शाळा इमारत (भाग-१) पाडून, या इमारतीमधून प्राप्त होणारे राडा-रोडा, स्ट्रक्चरल स्टील, लोखंड, दरवाजा, खिडक्या, क्रॉक्रीट, वीटा, फरशी, लोखंडी ग्रील, लोखंडी रेलींग, पत्रे, लाकूड, विद्युत वायरींग, विद्युत बटणे व इतर न काढता येणारे साहित्य, इमारत पाडणारे ठेकेदार मे.समीर एन्टरप्रायझेस यांना निविदेच्या विहित अटीनुसार इमारत पाडून, या इमारतीमधील साहित्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६३ विषय क्रमांक – १८

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/३०६/२०२०, दि.१४/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.16/1/2019-20 अन्वये अशुध्द जलउपसा केंद्र रावेत पंपगृहांतर्गत प्रतिदिन १०० द.ल.लि. जलउपसा क्षमता वाढविणेचे दृष्टीने पंपिंग मशिनरीची

उभारणी करणे आणि आनुषंगिक कामे करणेकामी मे.फ्लोमोर लिमिटेड नि.र.रू.15,02,28,159/- (अक्षरी र.रू.पंधरा कोटी दोन लाख अठ्ठावीस हजार एकशे एकोणसाठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.15,02,28,159/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.15,02,28,159/- पेक्षा 17.18% कमी म्हणजेच र.रु.12,44,18,961/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.12,44,18,961/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६४ विषय क्रमांक – १९

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/६/कावि/६३/२०२०, दि.१४/०८/२०२०

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०६.०७.२०२० ते दि.१२.०७.२०२० अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/६३/२०२०, दि.१४/०८/२०२० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६५ विषय क्रमांक – २०

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – शिक्षण

सुचक – मा.राहुल कलाटे अनुमोदक – मा.मयुर कलाटे

संदर्भ – मा.अति.आयुक्त-१ यांचे पत्र क्र.शिमं/०९/कावि/२६५/२०२०, दि.१४/०८/२०२०

विषय – सन २०२०-२१ या अर्थिक वर्षामध्ये शालेय विद्यर्थांसाठी शालेय उपयोगी शालेय साहित्य वाटप करणेबाबत.

मा.आयुक्त यांचेकडील क्र.शिक्षण/०९/कावि/२७१/२०२०दि.२०/०८/२०२० चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्र.२० वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६६ विषय क्रमांक – २१

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – शिक्षण

सुचक – मा.राहुल कलाटे अनुमोदक – मा.मयुर कलाटे

संदर्भ – मा.अति.आयुक्त-१ यांचे पत्र क्र.शिमं/०९/कावि/२६६/२०२०, दि.१४/०८/२०२०

विषय - विषय – सन २०२०-२१ या अर्थिक वर्षामध्ये शालेय विद्यर्थांसाठी शालेय उपयोगी शालेय साहित्य वाटप करणेबाबत. (शालेय वह्या)

मा.आयुक्त यांचेकडील क्र.शिक्षण/०९/कावि/२७१/२०२० दि.२०/०८/२०२० चे पत्रातील मा.आयुक्त यांचे मागणीनुसार विषय क्र.२१ वरील विषयपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६७ विषय क्रमांक – २२

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – ड क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षेका/१/कावि/४२/२०२०, दि.१४/०८/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत बालाजी विधी महाविद्यालय ताथवडे हे कोविड १९ अलगीकरण केंद्र (COVID CARE CENTERE) उभारणी करणेकामी माहे जून २०२० पासून तात्पुरत्या स्वरुपात ताब्यात घेणेत आले असून सदर ठिकाणी कोविड १९ पेशंटवर मनपा मार्फत उपचार सुरु आहेत. सदर कामी होणारे वीज खपाचे विजबिल मनपाने मराविविकं मर्यादित यांना अदा करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर ठिकाणचे माहे जून २०२० व जुलै २०२० चे वीजबील र.रु.४,४१,०३०/- म.रा.वि.वि.स अदा करणेबाबत बालाजी विधी महाविद्यालय ताथवडे यांनी दि.७/८/२०२० चे पत्रान्वये कळविले असून त्यानुसार सदरचे वीजबील र.रु.४,४१,०३०/- (अक्षरी र.रु.चार लाख एक्केचाळीस हजार तीस फक्त) म.रा.वि.वि.कं. मर्यादित पुणे यांना मनपाने अदा करणे क्रमप्राप्त व आवश्यक आहे. सदरचे वीजबील मुख्य कार्यालय मध्यवर्ती भांडार विभागाकडील "कोरोना निधी" या निधीतून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७३६८ विषय क्रमांक – २३

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – वैद्यकिय

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१०/कावि/२३९/२०२०, दि.१८/०८/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१०/कावि/२४०/२०२०, दि.१९/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

महाराष्ट्र शासनाकडील आदेशानुसार पुणे महानगर प्रदेश विभाग प्राधिकरणामार्फत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे मैदान, शिवाजीनगर आणि अण्णासाहेब मगर मैदान पिंपरी येथे उभारण्यात येणा-या जंबो हॉस्पीटल/कोव्हीड हॉस्पीटलची उभारणीचे काम सर्वोच्च प्राधान्याने हाती घेतले आहे. सदर कामाकरिता येत्या १५ ते २० दिवसांमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर मेडीकल इक्वीपमेंट व मेडीकल सेवा ऑपरेटर साठी अंदाजे ६०-७० कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे हे पुणे महानगर विकास प्राधिकरण, पुणे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचेकडील पत्र क्र.ईजी/वाकोहो/०७.२०/६११/११५५ शाखा दि.६/८/२०२० नुसार कळविले आहे. त्यानुसार र.रु.२५ कोटीचा निधी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांचेकडे विषयांकित कामकाजाकरिता वर्ग करणेकामी मध्यवर्ती भांडार विभागाककडील "कोवीड १९" या लेखाशिर्षातुन र.रु.२५ कोटी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांना अदायगीस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, पुणे महानगर विकास प्रधिकरण यांना १० कोटी चा निधी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६९ विषय क्रमांक – २४

दिनांक – २०/०८/२०२० विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१५/१०५/२०२०, दि.१७/०८/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/११/१५९/२०२०, दि.१९/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१ अंतर्गत गांधीनगर या झोपडपट्टीचे पुनर्वसन/पुननिर्माण करणेकामी कार्यकारी अभियंता, स्थापत्य BSUP प्रकल्प विभाग यांचे कडील पत्र क्र.स्था/BSUPप्र/३७०/२०२० दि.३१/०७/२०२० अन्वये कार्यकारी अभियंता, स्थापत्य BSUP प्रकल्प विभाग यांनी पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१ अंतर्गत गांधीनगर या झोपडपट्टीचे पुनर्वसन/पुनर्निर्माण करणे अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपरी वाघिरे क्षेत्रांतर्गत आरक्षण क्र.९९ (खेळाचे मैदान), आरक्षण क्र.१०१ (दवाखाना), आरक्षण क्र.१०२ (माध्यमिक शाळा), आरक्षण क्र.१०३ (किरकोळ बाजार) व आरक्षण क्र.१०४ (उद्यान) या प्रयोजनार्थ आरक्षित जागेवर झोपडपट्टीचे पुनर्वसन/पुनर्निर्माण करणेकामी नगरभूमापन, पिंपरी

चिंचवड या विभागाकडून शासकीय मोजणी करुन घेणेबाबत कळविले होते. सदर आरक्षण बाधित मिळकतींची शासकीय मोजणी करुन घेणेकामी येणारी फी कळविणेबाबत नगररचना व विकास विभागाकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/९६/२०२० दि.०५/०८/२०२० अन्वये नगरभूमापन, पिंपरी चिंचवड या विभागाकडे विचारणा केलेली होती. त्यास अनुसरुन उपरोक्त नगरभूमापन अधिकारी. पिंपरी चिंचवड यांचेकडील पत्र क्र.न.भू.अ./पंतप्रधान आवास योजना/झोपडपट्टी पुनर्वसन/२०२० पिंपरी दिनांक १०/०८/२०२० अन्वये नगरभूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी उपरोक्त आरक्षण बाधित मिळकतींच्या मोजणीकामी अतितातडी मोजणी फी र.रु.१,९८,०००/- इतकी रक्कम त्यांचे कार्यालयाकडे जमा करणेबाबत कळविले आहे. तरी नगरभूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी मागणी केल्याप्रमाणे उपरोक्त आरक्षण बाधित मिळकतींच्या मोजणीकामी अतितातडी मोजणी फी र.रु.१,९८,०००/- इतक्या रक्कमेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी मौजे पिंपरी वाघिरे क्षेत्रांतर्गत आरक्षण क्र.९९ (खेळाचे मैदान) (सि.स.नं.५४४२ ते ५४४८, ५४६९, ५४६९/१, ५४६९/२), आरक्षण क्र.१०१(दवाखाना)(सि.स.नं.५४४१पै), आरक्षण क्र.१०२(माध्यमिक शाळा) (सि.स.नं.५४४०), आरक्षण क्र.१०३(किरकोळ बाजार) (सि.स.नं.५४३०) व आरक्षण क्र.१०४ (उद्यान) (५४४०पै, ५४४१पै) या मिळकतींच्या अतितातडी मोजणी करणेकामी येणारी र.रु.१,९८,०००/-(अक्षरी र.रू.एक लाख अठ्याण्णव हजार फक्त) इतक्या रक्कमेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७० | विषय क्रमांक – २५

दिनांक – २०/०८/२०२० | विभाग – अ क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षेका/वि/जा/२९४/२०२०, दि.१९/०८/२०२०

२) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/२८९/२०२०, दि.१९/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मे.एमइपी सिस्टीम सोल्युशन्स प्रा. लि. यांनी दि.१८/०८/२०२० रोजीचे इमेल द्वारे होणा-या प्रकल्प खर्चाचे (अंदाजे २ कोटी) ०.५% एवढा मोबदला घेऊन सदरचे काम करणेस तयार असले बाबतचे कळविले आहे. मे.एमइपी सिस्टीम सोल्युशन्स प्रा.लि. यांना अशा प्रकारची कामे करण्याचा अनुभव असुन ते सद्या नेहरू नगर येथील कोविड-१९ रूग्णालया चे देखिल कामकाज करीत आहेत. त्यांच्या अनुभवाचा व त्यांना अदा करावा लागणारा कमीत कमी रक्कमेचा मोबदला विचारात घेता सदरचे काम मे.एमइपी सिस्टीम सोल्युशन्स प्रा.लि. यांचेकडून करून घेण्यास व त्या कामीचे 0.५% सल्लागार शुल्क मे.एमइपी सिस्टीम सोल्युशन्स प्रा. लि. यांना अदा करणे आवश्यक आहे. सबब, सदर कामाकरीता सल्लागार म्हणून मे.एमइपी सिस्टीम सोल्युशन्स प्रा. लि. यांची नेमणूक करणेस तसेच सदर कामापोटी एकूण होणा-या प्रकल्प खर्चाचे (अंदाजे २ कोटी) ०.५% एवढी फी सर्व करांसहित मे.एमइपी सिस्टीम सोल्युशन्स प्रा.लि. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७३७१ विषय क्रमांक – २६

दिनांक – २०/०८/२०२०

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१६ येथील उद्यान विकसीत करणे (अमृतयोजना) या कामाचे अंतीम बील अदा करणे आहे. तरी सदर बीलास सन २०२०-२१ या तरतूद नसलेने सदर बील बजेट पानांक ६४९ अ.क्र.१३(१) मधील अमृत योजना बगीचा/ ग्रीन स्पेसेस या लेखाशिर्षासाठी केंद्र शासनाच्या अमृत योजने अंर्तगत च-होली येथील अ.क्र.२/६४ (तसेच फ प्रभागातील सी.डी.सी.प्लॉट क्र.१ व ४ येथील जागेवर उद्यान विकसित करणे) वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२०-२१ ची तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.६ येथील उद्यान विकसीत करणे (अमृत योजना) | ६४९ | १३(१) | अमृत योजना | ० | ४२५००० | ० | ४२५००० |
| २. | केंद्र शासनाच्या अमृत योजने अंतर्गत च-होली येथील अ.क्र. २/६४ (तसेच फ प्रभागातील सी.डी.सी.प्लॉट क्र.१ व ४ येथील जागेवर उद्यान विकसीत करणे) | ६४९ | १३(३) | अमृत योजना | १०००००० | ० | ४२५००० | ५७५००० |
| | | | | एकूण | १०००००० | ४२५००० | ४२५००० | १०००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७२ विषय क्रमांक – २७

दिनांक – २०/०८/२०२०

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.५ मधील विकास कामांना खालील प्रमाणे वाढ/घट करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकामधील खालील नमूद केलेल्या प्रमाणे तरतूदीमध्ये वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२०-२१ ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०१९-२० साठी एकूण सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.५ गवळी नगर सॅन्डविक कॉलनी मधील सेवा वाहिन्या टाकलेल्या चरांची खडी मुरूम व बीबीएम पद्धतीने रस्त्यांची सुधारणा करणे | २३१ | ३७ | डाबरी रस्ते | १०००००० | २५०००० | ४५०००० | ० | ७००००० |
| २. | प्रभाग क्र.५ मधील परिसरात कलर पेव्हीग ब्लॉक बसविणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | २३८ | २१ | स्थापत्य विषयक का करणे | ८०००००० | २७००००० | ० | ४५०००० | २२५०००० |
| ३. | प्रभाग क्र.५ गवळी नगर सॅन्डविक कॉलनी मधील सेवा वाहिन्या टाकलेल्या चरांची खडी मुरूम व बीबीएम पद्धतीने दुरूस्ती करणे | ७१६ | ३० | किरकोळ दुरूस्ती व देखभाल | १०००००० | २५०००० | ४५०००० | ० | ७००००० |
| ४. | प्रभाग क्र.५ गवळी नगर व सॅन्डविक कॉलनी परिसरात स्थापत्य विषयक कामाची दुरूस्ती करणे | ७१६ | ३१ | किरकोळ दुरूस्ती व देखभाल | १०००००० | ५५०००० | ० | ४५०००० | १००००० |
| | | | | एकूण | | ३७५०००० | ९००००० | ९००००० | ३७५०००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७३ विषय क्रमांक – २८

दिनांक – २०/०८/२०२०

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ या अर्थिक वर्षामध्ये खालील प्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२०-२१ ची तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०२२-२१ चा सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जुन्या हॅरिस ब्रीजची दु रूस्ती करणे | ६४० | ११ | UTF अंतर्गत BRTS रस्त्यांची अनुषंगीक कामे | १०००००० | १५००००० | ० | २५००००० |
| २. | एम्पायर इस्टेट येथील मुख्य उड्डण पुलावर चढण्यास व उड्डाण पुलावरून उतरणेस रॅम्प बांधणे | ६४१ | ३० | UTF अंतर्गत BRTS रस्त्यांची अनुषंगीक कामे | १०००००० | ६०००००० | ० | ७०००००० |
| ३. | एम्पायर इस्टेटच्या पुलाची उर्वरीत कामे करणे | ६४२ | ०७ | UTF अंतर्गत BRTS रस्त्यांची अनुषंगीक कामे | १००००००० | | ७५००००० | २५००००० |
| | | | | एकूण | १२०००००० | ७५००००० | ७५००००० | १२०००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७४ विषय क्रमांक – २९

दिनांक – २०/०८/२०२०

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी येथील इंदिरागांधी उड्डाण पुलाखालील २०० चौ.मी. जागा दिपंकर मजूर सहकारी संस्था मर्यादित यांना १५ वर्षे कालावधी करिता भाडे तत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७५ विषय क्रमांक – ३०

दिनांक – २०/०८/२०२०

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.भिमाबाई फुगे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरवस्ती विकास योजना विभागामार्फत सहा महिने कालावधीकरिता तात्पुरपत्या स्वरूपात मानधन तत्वावर एम.एस.डब्ल्यु. शैक्षणिक अर्हता असलेल्या

२० समुह संघटकांच्या दि.०३/०३/२०२० च्या आदेशान्वये नेमणूका करणेत आलेल्या होत्या त्यापैकी १३ समुह संघटक कामावर हजर झाले तथापि करोना लॉकडाऊन मुळे प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांना रूजू करून घेता आलेले नाही. करोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा नसल्याने १३ समुह संघटकांना दि.३१ ऑगस्ट २०२० नंतर १ दिवसाची सेवा कालावधी खंडीत करून नेमणूका करणेस तसेच प्रतिक्षा यादीवरील तसेच यापुर्वी नागरवस्ती विकास योजना विभागाकडील कामकाजाचा अनुभव असलेल्या खालीलप्रमाणे एकूण २० समुह संघटकांची तात्पुरत्या स्वरूपात प्रति माह एकूण र.रू.२५,०००/- याप्रमाणे मानधनावर ६ महिने कालावधीकरिता नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | समुह संघटकांचे नाव |
|---|---|
| १ | श्री.पोटे जावजी किसन |
| २ | श्रीम.खरात वैशाली रविंद्र |
| ३ | श्री.मरगडे मनोज रामराव |
| ४ | श्रीम.लगाडे वैशाली अशोक |
| ५ | श्री.अहिरे लखन रमेशराव |
| ६ | श्रीम.सुकाळे श्रद्धांजली तुकाराम |
| ७ | श्री.गोयकर दत्तात्रय शिवाजी |
| ८ | श्रीम.पाटील रेश्मा उमेश |
| ९ | श्री.मापारी नागेश पंजाबराव |
| १० | श्रीम.पवळे जयश्री रविंद्र |
| ११ | श्रीम.वानखेडे किर्ती प्रल्हादराव |
| १२ | श्री.कावळे अमोल रामराव |
| १३ | श्री.जाधव शेखर श्रीराम |
| १४ | श्रीम. करंजकर सुप्रिया निलेश |
| १५ | श्रीम.सारिका राजेंद्र हारके |
| १६ | श्री. अशोक भास्कर भवारी |
| १७ | श्रीम. सुलक्षणा किरण कुरणे |
| १८ | श्रीम. दिपज्योती प्रकाश यादव |
| १९ | श्रीम. स्वाती धर्मा साबळे. |
| २० | श्रीम.तृषाली प्रभाकर चव्हाण |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
**स्थायी समिती**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/८०१/२०२०
दिनांक – २१/०८/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी